महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

# जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@ gmail.com

दुरध्वनी क्रमांक- 07172-250659

क्रमांक.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/395

दिनांक : 05 एप्रिल, 2021

---

**वाचा** :- 1. साथरोग कायदा, 1897

2. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51

3. फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973

4. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 15/03/2021

5. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/314 दि. 16.03.2021

6. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 27/03/2021

7. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/373 दि. 27.03.2021.

8. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 04/04/2021.

9. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/394 दि. 05.04.2021.

10. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 05/04/2021.

---

## : : आदेश : :

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2, 3, व 4 मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे व त्याबाबतची नियमावली प्रसिध्द करुन जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, कोरोना (कोविड-19) विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्याने मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचेव्दारे संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात **"ब्रेक दि चेन"(BREAK THE CHAIN)** अंतर्गत संदर्भ क्र. 8 चे आदेशान्वये दि. 30.04.2021 पावेतो ठरावीक बाबी प्रतिबंध करण्यासंबंधाने आदेश निर्गमीत केलेले असल्याने, राज्य शासनाकडील उक्त आदेशातील तरतूदी चंद्रपूर जिल्हयातील कार्यक्षेत्रात दिनांक 30 एप्रिल, 2021 पावेतो या कार्यालयाकडील संदर्भ 09 चे आदेशान्वये यथास्थिती लागु करुन प्रतिबंधात्मक/निर्बंधात्मक आदेश निर्गमीत करण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भ क्र. 10 चे आदेशान्वये, संदर्भ क्र. 08 वरील आदेशामध्ये काही बाबी सामाविष्ठ करुन पुनश्च आदेश निर्गमीत करण्यात आलेला आहे.

त्याअर्थी, मी, अजय गुल्हाने, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर असे आदेशीत करतो की, **मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भ क्र. 10 चे आदेशानुसार नव्याने समाविष्ठ केलेल्या बाबींस चंद्रपूर जिल्हयाचे संपुर्ण कार्यक्षेत्रात खालीलप्रमाणे लागु करीत आहेत :-**

1) या कार्यालयाकडील संदर्भ क्र. 09 अंतर्गत निर्गमीत करण्यात आलेल्या आदेशातील **परिच्छेद 1 (इ)** यामध्ये नमुद केलेल्या **अत्यावश्यक सेवेत खालील बाबींचा समावेश करण्यात येत आहे :-**
   - पेट्रोल पंप व पेट्रोलीयम संबंधीत उत्पादने
   - सर्व मालवाहक सेवा
   - डाटा सेंटर/ क्लाऊड सर्व्हीस पुरवठादार/माहिती तंत्रज्ञान सेवांना पुरक/सहाय्यक पायाभुत सेवा
   - शासकीय व खाजगी सुरक्षा विषयक सेवा (Security Services)
   - फळविक्रेते

2) खालील खाजगी संस्था/आस्थापना आठवडयाच्या सर्व दिवशी सकाळी 07.00 ते रात्री 08.00 या वेळेत सुरु राहतील परंतु त्यातील कार्यरत अधिकारी/कर्मचारी/कामगार यांनी भारत सरकारच्या निकषानुसार तात्काळ आपले लसीकरण करुन घ्यावेत व लसीकरण होत नाही तोपर्यंत RT-PCR निगेटीव्ह चाचणी अहवाल जवळ बाळगावा. सदर प्रमाणपत्र 15 दिवसांकरीता वैध राहील. सदर नियम 10 एप्रिल, 2021 पासुन लागु होईल. सदर नियमांचे उल्लंघन करणा-यांवर रुपये 1000 /- इतका दंड आकारण्यात येईल.

   अ) भारतीय प्रतिभुती व विनिमय बोर्ड (SEBI) कार्यालय व सेबीने अधिकृत केलेली कार्यालय जसे की, स्टॉक एक्सचेंज, डिपॉजीटरी व क्लिअरींग कार्पोरेशन (Depositories & Clearinig Corporations), सेबी अधिकृत मध्यस्थी संस्था (Internmediaries registered with SEBI).

   ब) भारतीय रिजर्व बँक व अधिकृत मध्यस्थी संस्था यामध्ये स्टॅण्डअलोन प्रायमरी डिलर्स (Standalone primary dealers), सी.सी.आय.एल (CCIL), एन.पी.सी.आय.(NPCI), पेंमेंट व्यवस्थेशी संबंधीत ऑपरेटर (payment system operator), भारतीय रिजर्व बँक अधिकृत वित्तीय बाजारात सहभाग घेणारे ऑपरेटर्स ( Financial market participants operating in RBI regulated markets) यांचा समावेश असेल.

   क) बिगर बँकींग वित्तीय आस्थापना

   ड) सर्व सुक्ष्म वित्तीय संस्था

   इ) वकीलांचे कार्यालय

   फ) कस्टम हाऊस अभिकर्ता/लसी/जिवनाश्यक औषधे/औषध उत्पादने वाहतुकी संबंधीत परवानाधारक वाहतुकदार

3) रेल्वे/बस/विमानाव्दारे प्रवास करणा-या व्यक्ती ज्यांचे कडे वैध तिकीट असेल त्या प्रवाशांना सोमवार ते शुक्रवार रात्री 08.00 ते सकाळी 07.00 किंवा शनिवार व रविवार या कालावधीत विमानतळ/बसस्थानक/रेल्वे स्थानक येथे जाणे-येणे करीता प्रवास करता येईल.

4) औद्योगिक कामगारांना त्यांचे कामाचे वेळेनुसार कामावर जाणे-येणे याकरिता सोमवार ते शुक्रवार रात्री 08.00 ते सकाळी 07.00 आणि शनिवार व रविवार या कालावधीत खाजगी बस/वाहनांने वैध ओळखपत्रासह प्रवास करण्यास मुभा असेल.

5) धार्मीक स्थळ सर्व नागरीकांकरीता बंद करण्यात आलेली आहे. तथापी, धार्मीक विधींशी संबंधीत व्यक्ती आपली कर्तव्ये बजावू शकतील. अश्या धार्मीक ठिकाणी लग्न/अंत्यविधी यांचे आयोजनास राज्य शासनाकडील दिनांक 04 एप्रिल, 2021 चे आदेशातील नमुद अटी व शर्तीचे अधीन राहुन मुभा असेल.

6) विद्यार्थ्यांना सोमवार ते शुक्रवार रात्री 08.00 नंतर किंवा शनिवार व रविवार या कालावधीत परिक्षा केंद्रावर जाणे व परत घरी येणे याकरीता वैध प्रवेशपत्रासह प्रवासास मुभा असेल.

7) शनिवार व रविवार या कालावधीत पुर्व निर्धारीत विवाहांना परवानगी दिली असल्यास संबंधीतांनी शनिवार व रविवार या संचारबंदीच्या कालावधीत विवाह आयोजीत करण्यासाठी त्या कार्यक्षेत्राचे उपविभागीय अधिकारी यांचेकडे अर्ज करावा. उपविभागीय अधिकारी यांनी अश्या पुर्व निर्धारीत विवाहांना राज्य शासनाकडील दिनांक 04 एप्रिल, 2021 चे आदेशातील नमुद अटी व शर्तीनुसार आयोजीत विवाहास परवानगी द्यावी.

8) घरकाम सहाय्यक/वाहन चालक/स्वयंपाकी यांना सोमवार ते शुक्रवार रात्री 08.00 नंतर आणि शनिवार व रविवार या कालावधीत कामावर जाणे-येणे याकरिता संबंधीत घरकाम सहाय्यक/वाहन चालक/स्वयंपाकी यांनी महानगरपालीका क्षेत्रांसाठी आयुक्त, महानगर पालीका, नगर परिषद/नगर पंचायत क्षेत्रासाठी मुख्याधिकारी आणि ग्रामीण क्षेत्रासाठी तहसिलदार यांचेकडे अर्ज करावा. संबंधीत प्राधिकृत अधिकारी यांनी अर्जाची शहानिशा करुन घरकाम सहाय्यक/वाहन चालक/स्वयंपाकी यांना ओळखपत्र वितरीत करावे.

**सदर आदेशाची अंमलबजावणी संपुर्ण चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात दिनांक 05.04.2021 चे रात्री 08.00 वाजेपासुन ते दिनांक 30.04.2021 चे रात्री 11.59 वाजेपर्यंत लागु राहील.**

**सदर आदेश माझे सही व शिक्क्यानिशी दि. 06.04.2021 रोजी निर्गमीत करण्यात येत**

सही/-

(अजय गुल्हाने)

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

**प्रतिलीपी :- माहितीस सविनय सादर.**

1. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-032
2. मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, मदत व पुनर्वसन, महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई – 032
3. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर

**माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव.**

4. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
5. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपू]
6. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालीका, चंद्रपूर
7. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
8. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, चंद्रपूर
9. स्टेशन मास्टर, दक्षिण रेल्वे, चंद्रपूर/बल्लारपुर
10. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
11. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
12. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
13. मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत (सर्व)
14. सर्व शासकीय विभाग प्रमुख/बँक व्यवस्थापक

**सदर आदेशास उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.**

6/4/21

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**